नि.दि.दा.क्र.२१७/२०१५
सुरेखा/सुगंधा व इतर
निशाणी – ७४ खाली

**<u>शपथेवर उलटतपास वादींतर्फे श्री. सी. ई. बर्गे वकील यांच्यामार्फत</u>**

१४. माझी स्वतःची १५ ते १६ एकर शेती आहे. मी कुठलेही सामाजीक कार्य गावामध्ये करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गावचा तंटामुक्ती अध्यक्ष आहे.

१५. गुळुंब वरुन फलटणला यायचे झाल्यास खंडाळा मार्गे खांबटकी घाट उतरुन लोणंद वरुन फलटणला यावे लागते. गुळुंब ते फलटण यामधील अंतर अंदाजे ५० कि.मी. एवढे आहे. फलटण वरुन चव्हाणवाडीचे अंतर अंदाजे ५ ते ६ कि.मी. एवढे आहे. मी तरडगाव येथील शेती गुळुंब वरुन येवुन जावुन करत होतो. मी बैलगाडी वापरुन येणे जाणे करायचो.

१६. माझ्या वडीलांचे पुर्ण नाव महादेव मारुती जाधव हे आहे. भगवानच्या वडीलांचे नाव गंगाराम मारुती जाधव हे आहे. मारुतीला भाऊ नव्हता. गंगारामला चार भाऊ होते. त्यांची नावे खाशाबा, रघुनाथ व लक्ष्मण हे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी गंगारामचा चुलत चुलत भाऊ नाही. मी गंगारामचा चुलत चुलत भाऊ आहे हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा माझ्या जवळ नाही.

१७. हे म्हणणे खरे नाही की, येवुन जावुन शेती करणे हा फार अडचणीचा विषय आहे व फार खर्चीक आणि कष्टाचा विषय आहे. हे म्हणणे खरे आहे की, तरडगाव येथील शेती जिराईत स्वरुपाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या शेतीमध्ये पेरणी करण्याकरीता केवळ दोन ते चार तासांचा अवधी लागतो. मी ५ ते ६ एकर क्षेत्र पेरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतंत्र पेरणी करत होतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, ते व उत्तम दिनकर माने असे मिळून पेरणी करायचे. आमच्या दोघांचे बी एकत्रच असायचे. त्यांचा असा कुठलाही स्वतंत्र भाग नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, उत्तम दिनकर माने सुध्दा पेरणीबाबत सांगु शकले असते. हे

म्हणणे खरे नाही की, पेरणीकरीता माझी कुठलीही गरज नव्हती व उत्तम दिनकर माने हे एकटेच पेरणी करु शकले असते.

१८. हे म्हणणे खरे नाही की, मी गुळुंब गावचा असल्यामुळे प्रतिवादींना सहकार्य करत आहे. हे मला सांगता येणार नाही की, पुर्वी एखाद्या पुरुषाची पत्नी लहान वयातच मरण पावली असल्यास त्याच्या दुसऱ्या पत्नीला सुध्दा पहील्याच पत्नीच्या नावे संबोदल्या जायचे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, पहिली सुगंधा वारली असल्यामुळे हणंमतच्या दुसऱ्या पत्नीचे नाव सुध्दा सुगंधा ठेवण्यात आले होते.

१९. मिनाच्या लग्नाबाबतचा कागदोपत्री पुरावा आहे. तीच्या जन्माबाबातचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार आता सांगतात की, मिनाच्या जन्माचा सुध्दा कागदोपत्री पुरावा त्यांच्याकडे आहे.

२०. ज्या जमीनी मी पेरत होतो त्यांच्या चतुःसीमा मला सांगता येतील. गट क्र.१५२० च्या पश्चिमेला संजय माने यांचे क्षेत्र आहे, पुर्वेला गाडे यांचे क्षेत्र आहे, उत्तरेला निवृत्ती गायकवाड यांचे क्षेत्र आहे व दक्षिणेला जगन्नाथ गायकवाड यांचे क्षेत्र आहे. गट क्र.१५२० चे क्षेत्रफळ अंदाजे चार ते साडे चार एकरांचे आहे.

२१. मला गट क्र.११३१ चे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. तसेच गट क्र. ११३२ चे क्षेत्रफळ सुध्दा सांगता येणार नाही. गट क्र. ११४६ हे अर्धा एकरच्या आसपास आहे. गट क्र.२२३९ चे क्षेत्रफळ मला सांगता येणार नाही. विहीर गट क्र.१५२० मध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही पेरणी केली नसल्यामुळे मला जमीनींबाबत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ च्या घराचा जो इतिहास मी सांगीतला तो खोटा सांगितला.

२२. हे मला माहीती नाही की, वहिवाटीबाबत व पेरणी बाबत इतर सहहिस्सेदारांना

माझ्यापेक्षा चांगल्याप्रकारे माहीती आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी माझा काहीएक संबंध आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादींची वहिवाट मी पाहीलेली नाही असे मी खोटे सांगितले.

२३. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ चा विवाह दिनांक १३/०६/१९८६ रोजी झाला असे मी स्वतःच्या मनाने सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ चे माहेर तरडगाव असल्यामुळे तीच्या लग्नाबाबत तरडगावच्या लोकांना माहीती असेल. हे म्हणणे खरे नाही की, रे.दि.मु.क्र.३८/२००३ या दाव्याबाबत मला काहीही माहीती असण्याचे काहीही कारण नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ने तीच्या उलटतपासामध्ये सदरहु दाव्या संदर्भात मान्य केल्यामुळे मी माझ्या पुराव्यामध्ये त्या बाबीला छेद देण्याकरीता खोटे कथन केलेले आहे.

२४. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खरेदीपत्रांबाबत मी माझ्या शपथपत्रामध्ये नमूद केले आहे ते खरेदीपत्र न्यायालयामार्फत रद्द झालेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ माझ्या गावची असल्यामुळे तीला मदत करण्याकरीता मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामधील संपुर्ण मजकुर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण  
फेरतपास नाही

श्रवणोत्तर स्विकृत  
माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण  
दिनांक २८/०१/२०२५

(आर. डी. भुयारकर)  
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, फलटण